Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

।रविवार, दि. १९ एप्रिल २०२६। वर्ष १ ।अंक ११ ।पाने २।
DIGITAL EDITION



अभिषेक शर्माने वीरेंद्र सेहवागचा रेकॉर्ड मोडला!
(पान २ वर)

Selected

होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा बंद

मुंबई : इराणशी संबंधित जहाजांची नाकेबंदी हटवणार नाही, असे अमेरिकेने शुक्रवारी जाहीर केल्यानंतर इराणने शनिवारी पुन्हा होर्मुझच्या सामुद्रधुनीवर निर्बंध लादले. यामुळे जहाजांच्या वाहतुकीमध्ये पुन्हा अडथळे निर्माण झाले आहेत.अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी जाहीर केली होती. मात्र इराण-अमेरिकेदरम्यान अणुकार्यक्रमासह करार होत नाही, तोपर्यंत नाकेबंदी लागू राहील, असेही अमेरिकेकडून सांगण्यात आले. लेबनॉनस्थित आणि इराण-समर्थित हेजबोला आणि १० दिवसांचा शस्त्रविराम जाहीर झाल्यानंतर इराणने होर्मुझची सामुद्रधुनी व्यापारी जहाजांसाठी पूर्णपणे पुन्हा खुली केल्याची घोषणा केली होती. त्यातच अमेरिका आणि इराण यांच्यात करार होण्याची शक्यता वाढल्याने त्या आशेवर शुक्रवारी तेलाचे दर कमी होऊ लागले. मात्र ट्रम्प आणि त्यापाठोपाठ इराणच्या घोषणेमुळे जागतिक अर्थव्यवस्थाला हादरवून सोडणारे ऊर्जा संकट अधिक गंभीर होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

अंमलीपदार्थ विरोधात कठोर मोहिम राबवा

धर्मांतरासारखे प्रकार खपवून घेऊ नका!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस महासंचालकांना दिले आदेश

जन सम्राट टाईम्स

मुंबई : धर्मांतर साखरे प्रकार अजितबात खपवून घेऊ नका, नाशिकमधील धर्मांतर प्रकरणाच्या मुळाशी जावे तसेच अंमलीपदार्थ विरोधात राज्यभरात कठोर मोहिम राबविण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पोलिसांना दिले.राज्यात गेल्या काही दिवसांपासून गाजत असलेल्या नाशिक धर्मांतर आणि भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज गृह विभाग आणि राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा आढावा घेतला. पोलीस महासंचालक सदानंद दाते, गृह विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, राज्य दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख नवल बजाज, नाशिक पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्यासह वरिष्ठ पोलिस अधिकारी उपस्थित होते. बैठकीत फडणवीस यांनी नाशिक धर्मांतर, भोंदूबाबा अशोक खरात, परतवाडा, गोरेगाव अंमलीपदार्थ आदी प्रकरणांच्या तपासाचा घेतला आढावा आणि पोलिस विभागाला विविध सूचना दिल्या. नाशिकमधील अशोक खरात प्रकरणात पीडितांना संपूर्ण विश्वास द्या.या प्रकरणात कुणीही दोषी असो त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. न्यायालयात हे प्रकरण मजबूत कसे होईल, यासाठी भक्कम पुरावे गोळा करा. तपासात अपराधसिद्धी हा महत्वाचा घटक असला पाहिजे अशा सूचना त्यांनी दिल्या. त्याचप्रमाणे नाशिकमधील आयटी कंपनीतील धर्मांतरण

प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी कठो भूमिका घेतली असून राज्यात कुठेही धर्मांतरासारखे प्रकार हे अजिबात खपवून घेऊ नका असे सक्त आदेश दिले.नाशिक पोलिसांनी स्वतःहून हे प्रकरण उजेडात आणल्याबद्दल त्यांचे अभिनंतर करताना या प्रकरणाचा तपासही तितकाच दमदार झाला पाहिजे. यात असणाऱ्या सर्व पॅटर्नचा तपास करा, कोणताही अॅगल तपासातून सुटू नये. तसेच या प्रकरणाच्या मुख्य सूत्रधाराचा शोध घ्या. राज्यात अन्य कुठेही असे प्रकार घडत असल्यास कठोर कारवाई करा असे आदेशही त्यांनी दिले. काही दिवसांपूर्वी गोरेगाव येथे एका पार्टीत अंमलीपदार्थ सेवनाने दोन तरुणांचा मृत्यू झाला होता. या घटनेची गंभीर दखल घेत संपूर्ण राज्यात अंमलीपदार्थ विरोधात धडक मोहिम राबवा. अंमलीपदार्थ विरोधात मोठ्या प्रमाणात कारवाया करा. तरुणाईच्या भविष्याशी निगडित ही बाब आहे, त्यामुळे अशी प्रकरणे एकदम गांभीर्याने घ्या असे आदेशही फडवणवीस यांनी दिले. या प्रकरणात पीडितांचे समुपदेशन करून त्यांना तक्रार देण्यासाठी विश्वास दिला पाहिजे. यासाठी संबधित समाजसेवकांची मदत घ्यावी. अमरावतीमधील परतवाडा लैगिंक शोषण प्रकरणात पिडीतांना तक्रार देण्यासाठी विश्वास देणे आवश्यक आहे. त्यासाठी समुपदेशकाची मदत घ्या, सबंधित प्रकरणात समाज सेवकांची मदत घेऊन पीडितांना आधार देण्यावर भर देण्याच्या सूचनाही त्यांनी पोलिसांना दिल्या.धर्मांतर साखरे प्रकार अजितबात खपवून घेऊ नका, नाशिकमधील धर्मांतर प्रकरणाच्या मुळाशी जावे तसेच अंमलीपदार्थ विरोधात राज्यभरात कठोर मोहिम राबविण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पोलिसांना दिले.राज्यात गेल्या काही दिवसांपासून गाजत असलेल्या नाशिक धर्मांतर आणि भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज गृह विभाग आणि राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा आढावा घेतला. पोलीस महासंचालक सदानंद दाते, गृह विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, राज्य दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख नवल बजाज, नाशिक पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्यासह वरिष्ठ पोलिस अधिकारी उपस्थित होते.

कठोर शिक्षा झाली पाहिजे

बैठकीत फडणवीस यांनी नाशिक धर्मांतर, भोंदूबाबा अशोक खरात, परतवाडा, गोरेगाव अंमलीपदार्थ आदी प्रकरणांच्या तपासाचा घेतला आढावा आणि पोलिस विभागाला विविध सूचना दिल्या. नाशिकमधील अशोक खरात प्रकरणात पीडितांना संपूर्ण विश्वास द्या.या प्रकरणात कुणीही दोषी असो त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. न्यायालयात हे प्रकरण मजबूत कसे होईल, यासाठी भक्कम पुरावे गोळा करा. तपासात अपराधसिद्धी हा महत्वाचा घटक असला पाहिजे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

कोकण हापूसची आवक मोठ्या प्रमाणावर घटली!

अक्षय तृतीयेला हापूसचे दर काय?

जन सम्राट टाईम्स

मुंबई : कोकण हापूसला यंदा हवामान बदलाचा मोठा फटका बसला. उत्पादनात मोठी घट झाल्यामुळे अक्षय तृतीयाच्या पार्श्वभूमीवर वाशी बाजार समितीत होणाऱ्या कोकण हापूसची आवक दहा हजार पेट्यांनी घटली आहे. ग्राहकांना किरकोळ बाजारात दर्जानुसार ६०० ते १८०० रुपये डझन दराने आंबा उपलब्ध होईल. गतवर्षी १८ एप्रिल रोजी वाशी बाजार समितीत एकूण १ लाख ४ हजार ६४३ पेट्यांची आवक झाली होती. त्यात कोकण हापूसची आवक ६८ हजार ८८६ पेट्या, तर परराज्यातून ३५ हजार १५७ पेट्यांचा समावेश होता. आज, शनिवारी एकूण ९४ हजार ६ पेट्यांची आवक झाली आहे. परराज्यातून झालेली आवक गतवर्षा इतकीच ३५ हजार ११२ पेट्या झाली आहे. पण, कोकणातून झालेली आवक दहा हजार पेट्यांनी घटली आहे. कोकणातून ५८ हजार ८९४ पेट्यांची आवक झाली आहे. कोकण हापूसचा दर दर्जानिहाय किरकोळ बाजारात ६०० ते १८०० रुपये डझन राहण्याचा अंदाज आहे. डागी, कमी दर्जाचा आंबा ६०० ते ७०० रुपये डझन आणि चांगल्या दर्जाचा आंबा १५०० ते १८०० रुपये डझन राहण्याचा अंदाज वाशी बाजार समितीतील व्यापारी संजय पानसरे यांनी दिली आहे.हंगामात कोकण हापूसची आवक सरासरीपेक्षा कमीच राहण्याचा अंदाज आहे. पण, पंधरा मेपर्यंत कोकण हापूस बाजारात पुरेशा प्रमाणात उपलब्ध असेल. कोकणात पाऊस, अवकाळी पाऊस पडला नाही तर जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत कमी – जास्त प्रमाणात आवक होत राहील. कर्नाटकमधून आंब्याची आवक सुरू झाली असून, जूनपर्यंत आवक सुरू राहील.

१५ मेपर्यंत कोकण हापूसची उपलब्धता

सध्या बाजारात कोकण हापूसची उपलब्धता चांगली आहे. १५ मेपर्यंत कोकण हापूसची बाजारातील उपलब्धता चांगली राहील. किरकोळ बाजारात कोकण हापूसचे दर दर्जानिहाय ६०० ते १८०० रुपये डझन राहतील. कोकण हापूसचे उत्पादन कमी असल्यामुळे दरात फार घट होण्याची शक्यता नाही, अशी माहिती वाशी बाजार समितीतील आंबा व्यापारी संजय पानसरे यांनी दिली.

बनावट सुगंधित तंबाखू व किमाम तयार करणाऱ्या कारखान्यावर छापा

जन सम्राट टाईम्स

अहिल्यानगर : शरीरास अपाय होईल अशा रसायनांचा वापर करून बनावट सुगंधी तंबाखू तयार करणाऱ्या कारखान्यावर पोलिस व अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने छापा टाकून तिघांना अटक केली तसेच १३ लाख ९२ हजार १९० रुपये किंमतीचे साहित्य जप्त केले. शहरातील पाइपलाइन रस्त्यावरील गजराजनगर भागातील कालीमाता मंदिराजवळ पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई

केली.
पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी दिलेल्या माहितीनुसार असिफ खुदाबक्ष तांबोळी (वय ५०, रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर), जफर चांद शेख (वय ३८, रा. मुकुंदनगर), दाऊद बाबुमिया शेख (वय ४२, रा. सदर बाजार, भिंगार, अहिल्यानगर अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. या कारवाईमध्ये अन्नसुरक्षा अधिकारी राजेश बडे यांनीही सहभाग घेतला. शहरातील गजराजनगर भागात राज्यात विक्रीस प्रतिबंध असलेली व शरीरास अपायकारक अशी सुगंधित तंबाखू तयार करण्याचा कारखाना चालवला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी अन्न व औषध प्रशासन विभागाला माहिती कळवून घटनास्थळी बोलवले.छापा टाकलेल्या कारखान्यात साधी तंबाखू आणून त्यात रसायन, रंग यांचे मिश्रण तयार करून त्यापासून बनावट सुगंधीत तंबाखू व पानांमध्ये टाकण्याचा बनावट किमाम तयार केले जात असल्याचे आढळले.

जिल्हा परिषद शिक्षकांच्या यंदा बदल्या नाही!

जन सम्राट टाईम्स

मुंबई : जनगणना तसेच मतदारयाद्यांच्या विशेष पडताळणी मोहीम (एसआरआय) या कामांची जबाबदारी शिक्षकांवर टाकण्यात आली आहे. या दोन्ही महत्त्वाच्या सरकारकी कामांसाठी कर्मचारी उपलब्ध व्हावेत म्हणून राज्य सरकारने यंदा जिल्हा परिषद शिक्षकांच्या सर्वसाधारण बदल्या रोखल्या आहेत. ग्रामविकास विभागाकडून याविषयीचे पत्र जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठविण्यात आले आहे. केंद्र सरकारने २०२७ च्या जनगणनेचे देशव्यापी वेळापत्रक जाहीर केले आहे.त्यानुसार महाराष्ट्रात जनगणनेचा पहिला टप्पा १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत पार पडेल. तर १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत गणना केली जाईल. या दरम्यान सुमारे २ लाख ६४ हजार प्रगणक आणि पर्यवेक्षक प्रत्यक्ष घरांना भेटी देऊन डिजिटल पद्धतीने माहिती संकलित करणार आहेत. त्याचप्रमाणे एसआयआरसाठीही शिक्षकांना आदेश काढण्यात आले असून त्याची जबाबदारीही शिक्षकांवरच सोपविण्यात आली .

मंत्र्यांसोबत एकाच व्यक्तीला मंत्रालयात प्रवेश

मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशीची गर्दी टाळण्यासाठी आदेश...

जन सम्राट टाईम्स

मुंबई : मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी एखाद्या मॉलमध्ये होणाऱ्या गर्दीप्रमाणे मंत्रालयात गर्दी उसळते. मंत्र्यांच्या पाठोपाठ त्यांचे समर्थकही मंत्रालयात त्यांच्या गाडीतून किंवा त्यांच्या मागोमाग मंत्रालयात शिरतात. यामुळे सातव्या मजल्यावरील बैठकीच्या समिती सभागृहाबाहेर होणारी झुंबड रोखण्यासाठी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी कडक निर्बंध लादले आहेत. मंत्रिमंडळ बैठकीवेळी मंत्र्यांसोबत केवळ एकाच व्यक्तीला प्रवेश दिला जाणार आहे. मुख्य सचिवांनी सर्व मंत्री कार्यालये आणि विभागांना स्पष्ट निर्देश दिले आहेत. मंत्र्यांची भेट घेणे किंवा मतदारसंघातील प्रश्न मांडण्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी मंत्रालयात अनेकजण उपस्थित असतात. बैठकीनंतर मंत्र्यांना भेटण्यासाठी खूप गर्दी होते. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सर्व मंत्री, राज्यमंत्री, मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, यांच्यासाह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित असतात. याशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीला मंत्रिमंडळ बैठकीत उपस्थित राहता येत नाही. तरीही मंत्रालयात खूप गर्दी असते. त्यामुळे कामकाजात अडथळा निर्माण होतो.हे रोखण्यासाठी मंत्र्यांसोबत त्यांच्या कार्यालयातील केवळ एका व्यक्तीलाच मंत्रिमंडळ सभागृहापर्यंत प्रवेश मिळणार आहे. याबाबत सर्व मंत्री आणि विभागांनाही सूचना देण्यात आल्या आहेत. जर

इतर कोणत्याही व्यक्तीला बैठकीला उपस्थित राहायचे असेल तर त्यांना मुख्यमंत्र्यांची पूर्वपरवानगी घ्यावी लागणार आहे. त्याची कागदपत्रे संबंधित सचिव कार्यालय आणि संबंधित सुरक्षा अधिकाऱ्यास सादर करावीत.मंत्रिमंडळ बैठक जर सह्याद्री राज्य अतिथीगृहात असेल तर फक्त आमदार आणि खासदारांना प्रतीक्षा खोलीत प्रवेश द्यावा. बैठक सुरू असताना आमदार खासदारांचे स्वीय सहायक यांना बैठकीच्या परिसरात प्रवेश देऊ नये. बैठकीआधी आणि बैठकीनंतर दोन तास मंत्रालयाच्या मंत्रिमंडळ सभागृह किंवा सातव्या व्या मजल्यावर कोणतीही बैठक आयोजित करण्यात येऊ नये, असे स्पष्ट निर्देश अग्रवाल यांनी सर्व विभागांना दिले आहेत. मंत्रिमंडळ बैठकीवेळी मंत्र्यांसोबत केवळ एकाच व्यक्तीला प्रवेश दिला जाणार आहे. मुख्य सचिवांनी सर्व मंत्री कार्यालये आणि विभागांना स्पष्ट निर्देश दिले आहेत. मंत्र्यांची भेट घेणे किंवा मतदारसंघातील प्रश्न मांडण्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी मंत्रालयात अनेकजण उपस्थित असतात. बैठकीनंतर मंत्र्यांना भेटण्यासाठी खूप गर्दी होते. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सर्व मंत्री, राज्यमंत्री, मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, यांच्यासाह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित असतात. याशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीला मंत्रिमंडळ बैठकीत उपस्थित राहता येत नाही. तरीही मंत्रालयात खूप गर्दी असते. त्यामुळे कामकाजात अडथळा निर्माण होतो.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

राज्यात होणार 11 नवीन जिल्ह्याची निर्मिती?

11 नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालये सुरु; मुंबईत कुलाबा-दादरला तहसील कार्यालये

जन सम्राट टाईम्स

शासकीय कामकाज अधिक लोकाभिमुख, सुलभ व्हावा, प्रशासनावरील पडणारा कामाचा ताण कमी करून नागरिकांना स्थानिक पातळीवर सुविधा उपलब्ध होण्यासाठी राज्यात नवीन 20 जिल्हे आणि 81 नवीन तालुके निर्मितीचे प्रस्ताव आले आहेत. मात्र नव्या जनगणनेची अधिकृत आकडेवारी प्राप्त झाल्यानंतर नवीन जिल्ह्यांची घोषणा होऊ शकते, असे सरकारी दरबारी सांगितले जात असताना ठाणे, रत्नागिरी, पुणे, सातारा, सोलापूर, जळगाव, अमरावती, यवतमाळ , बुलढाणा, नांदेड,

नागपूर या जिल्ह्यांमध्ये नवीन 11 अपर जिल्हाधिकारी कार्यालये (स्वतंत्र कारभार), 8 उपविभागीय कार्यालये, दोन तहसीलदार आणि 69 अपर तहसीलदार कार्यालयांची झालेली निर्मिती म्हणजे 11 नव्या जिल्ह्यांच्या निर्मितीचा एक महत्वाचा टप्पा समजला जात आहे. 1 मे 1960 रोजी महाराष्ट्राची स्थापना झाली तेव्हा 26 जिल्हे होते. 1 ऑगस्ट 2014 मध्ये ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून पालघर हा महाराष्ट्रातील 36 वा जिल्हा निर्माण करण्यात आला आहे. हे सर्व जिल्हे कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर या सहा महसूल विभागांमध्ये विभागले गेले आहेत. राज्यात एकूण 358 तालुके असून मुंबई शहर जिल्ह्यात एकही तालुका अस्तित्वात नाही. त्यामुळे कुलाबा आणि दादर या दोन नवीन तहसीलदार कार्यालयांची निर्मिती ही मुंबईकरांना दिलासा देणारी आहे. दुसरीकडे प्रशासकीय कामकाज अधिक लोकाभिमुख होण्यासाठी मूळ जिल्ह्यांचे विभाजन करून 20 नवीन जिल्ह्यांच्या निर्मिती करण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत असून त्यांचे प्रस्ताव शासन दरबारी प्रलंबित आहेत. त्यामध्ये ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून कल्याण, अहमदनगरमध्ये शिर्डी, संगमनेर, श्रीरामपूर, नाशिकमध्ये मालेगाव, कळवण, जळगाव जिल्ह्यात भुसावळ, चाळीसगाव, लातूर आणि नांदेडमध्ये उदगीर, किनवट, बीड जिल्ह्यात अंबाजोगाई, पुणे जिल्ह्यात बारामती, शिरूर, पालघरमध्ये जव्हार, अमरावतीत अचलपूर, यवतमाळमध्ये पुसद, बुलढाणा खामगाव, सांगली/सातारा/सोलापूरमध्ये माणदेश/कराड आणि रत्नागिरी- रायगड जिल्ह्यातून महाड / मंडणगड जिल्ह्याच्या निर्मितीचे प्रस्ताव आले आहेत. मात्र राज्याची आर्थिक स्थिती आणि 2011 नंतर जनगणना होऊ न शकल्याने जिल्ह्याची निर्मितीचे प्रस्ताव प्रलंबित आहेत.

नव्या जिल्हा निर्मितीचा मार्ग सुकर

परिक्षेत्र काय असेल याचा निर्णय विभागीय आयुक्त आणि उपविभागीय अधिकारी, अपर तहसीलदार आणि तहसीलदार कार्यालयाचे मुख्यालय आणि कार्यक्षेत्रांबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने प्रशासनाने प्रक्रिया सुरु केली आहे. ही नवीन कार्यालये कार्यान्वित होईपर्यंत भारताची जनगणना पूर्ण होईल आणि नव्या जिल्हा निर्मितीचा मार्ग सुकर होईल, असा आशावाद आमदार तसेच नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. तर जोपर्यंत जनगणनेची अधिकृत आणि नवीन आकडेवारी प्राप्त होत नाही, तोपर्यंत या प्रस्तावावर अंतिम निर्णय घेतला जाणार नाही.

विधेयक फेटाळल्याने भाजप आक्रमक!

जन सम्राट टाईम्स

मुंबई : महिला आरक्षणासंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत फेटाळल्यानंतर देशातील राजकारण तापले असून, भाजपने शनिवारी रस्त्यावर उतरून विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीविरोधात आक्रमक आंदोलन सुरू केले. विरोधकांनी महिलांच्या हक्कांशी विश्वासघात केल्याचा आरोप करत भाजपच्या महिला नेत्यांनी दिल्लीमध्ये काँग्रेस नेते राहुल गांधींच्या घरावर मोर्चा काढला. महिलांना आरक्षण न मिळण्याला काँग्रेस व इतर विरोधी पक्ष जबाबदारी असून हे कथित वास्तव लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी देशभर आंदोलन करण्याचा निर्णय शुक्रवारी 'रालोआ'च्या बैठकीत घेण्यात आला होता. भाजप महिला मोर्चा देशभर जिल्हा स्तरावर आंदोलन उभारणार असून, प्रत्येक ठिकाणी मोर्चे, निदर्शने आणि सभा घेऊन विरोधकांचा कथित 'महिला विरोधी चेहरा' उघड करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. पश्चिम बंगाल व तामीळनाडूमधील आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. दिल्लीत शनिवारी केंद्रीय मंत्री रक्षा खडसे, खासदार हेमा मालिनी आणि बांसुरी स्वराज यांच्या नेतृत्वाखाली भाजपने काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या निवासस्थानावर मोर्चा काढला. आंदोलकांनी काळे झेंडे दाखवत, कपाळावर काळी पट्टी बांधून 'धोकेबाज' आणि 'नारीशक्तीचा अपमान' अशा घोषणा दिल्या. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ताही सहभागी झाल्या होत्या.

Selected

पंतप्रधान मोदींवर ट्रम्प यांचे नियंत्रण

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे नियंत्रण आहे, अशी टीका काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शनिवारी केली. ट्रम्प यांना मोदींच्या आर्थिक व्यवहार, उद्योजक अदानींबरोबरचे संबंध ठाऊक आहेत, असा दावाही राहुल यांनी केला. तमिळनाडूच्या राणीपेट येथे प्रचारसभेत बोलताना राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांनी लक्ष्य केले. घटनादुरुस्ती विधेयकावर चर्चेदरम्यान संसदेमध्ये पंतप्रधान निस्तेज दिसत होते, कारण ट्रम्प त्यांना नियंत्रित करत आहेत, असा दावा राहुल यांनी केला. ते म्हणाले, "जर डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, मोदी उडी मारा, तर मोदी उडी मारतात. जर ते म्हणाले की, आडवे व्हा तर मोदी आडवे होतात. ट्रम्प त्यांच्यावर कसे नियंत्रण ठेवतात? ते एप्स्टीन फाइलच्या माध्यमातून मोदींना नियंत्रित करतात. कारण त्यांना मोदींच्या आर्थिक व्यवस्था माहीत आहेत आणि मोदींचे अदानींशी असलेले संबंध त्यांना समजतात."राहुल यांनी दावा केला की, जसे ट्रम्प मोदींना नियंत्रित करतात, त्याच प्रकारे मोदींना अण्णाद्रमुकच्या माध्यमातून तमिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांवर नियंत्रण ठेवायचे आहे. आपण द्रमुक किंवा मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्यावर नियंत्रण ठेवू शकत नाही हे मोदींना माहीत आहे. त्यासाठीच राज्यात अण्णाद्रमुकची सत्ता यावी, अशी पंतप्रधानांची इच्छा आहे, असे राहुल म्हणाले.ते (पंतप्रधान) विरोधकांचा सामना करू शकले नाहीत. ते बाजूला बसले होते. त्याचे कारण आहे, त्यांच्यावर अमेरिकेचे नियंत्रण आहे.

शॉर्टसर्किटमुळे मका पीक जळून खाक!

शेतकऱ्याचे लाखोंचे नुकसान;पंचनामा करून तातडीने भरपाईची मागणी

जन सम्राट टाईम्स

धरणगाव : धरणगाव तालुक्यातील भवरखेडे येथे विजेच्या शॉर्टसर्किटमुळे शेतकऱ्याचे उभे मका पीक जळून खाक झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या आगीत शेतकरी विनायक पुना ब्राह्मणे यांचे सुमारे एक एकर क्षेत्रावरील मका पीक तसेच ठिबक सिंचनाची संपूर्ण यंत्रणा भस्मसात झाली असून, या घटनेत एक लाखांहून अधिकचे आर्थिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. घटनेनंतर शेतकरी विनायक ब्राह्मणे यांनी जळालेल्या पिकाकडे पाहत ढसाढसा रडत आपली व्यथा व्यक्त केली. पाच महिन्यांच्या कष्टानंतर उभे केलेले पीक काही क्षणांत जळून खाक झाल्याने त्यांच्या कुटुंबावर

मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शेतात वीजपुरवठा सुरू असताना अचानक शॉर्टसर्किट झाले. विजेच्या तारा खाली झुकलेल्या अवस्थेत असल्याने ठिणग्या पडून मका पिकाला आग लागली. काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण करत संपूर्ण शेत जाळून टाकले. यामध्ये ठिबक सिंचनाच्या नळ्या आणि पाईपलाईनदेखील पूर्णपणे जळून नष्ट झाल्या. या घटनेनंतर परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. महावितरणच्या निष्काळजीपणामुळे अशा प्रकारच्या घटना घडत असल्याचा आरोप स्थानिक शेतकऱ्यांनी केला आहे. शेतातील विजेच्या तारा योग्य उंचीवर नसल्याने आणि देखभाल न झाल्यानेच शॉर्टसर्किट होऊन ही दुर्घटना घडल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, या घटनेमुळे शेतकरी वर्गात संतापाची लाट पसरली असून प्रशासनाने तातडीने याची दखल घेण्याची मागणी करण्यात येत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करावा आणि शेतकऱ्याला तात्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे. शेतकरी विनायक ब्राह्मणे यांनी प्रशासनाकडे निवेदन देत नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

महावितरण निष्काळजीपणाचा आरोप

शेतातील खाली आलेले विजेचे तारे तात्काळ दुरुस्त करून भविष्यात अशा घटना टाळाव्यात, अशीही त्यांनी विनंती केली आहे. या घटनेमुळे आधीच नैसर्गिक संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर आता वीज यंत्रणेच्या निष्काळजीपणामुळे आणखी एक मोठे संकट उभे राहिले आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

जन सम्राट टाईम्स विशेष बातमी

सनरायझर्स हैदराबादचा सीएसके विरुद्ध विजय!

गोलंदाजांची दमदार कामगिरी

जन सम्राट टाईम्स

मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : आयपीएल २०२६ स्पर्धेतील २७ वा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि सनरायझर्स हैदराबाद या दोन्ही संघांमध्ये पार पडला. दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात हैदराबादने पहिल्या डावात फलंदाजी करताना ९ गडी बाद १९४ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या चेन्नई सुपर किंग्ज संघाला सुरुवात तर चांगली मिळाली होती. पण हवा तसा शेवट करता आला नाही. चेन्नईचा संघ विजयापासून १० धावा दूर राहिला. यासह हैदराबादने या स्पर्धेतील तिसऱ्या विजयाची नोंद केली आहे. चेन्नईला हा सामना जिंकण्यासाठी १९५ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना चेन्नई सुपर किंग्ज संघाला सुरुवातीलाच मोठा धक्का बसला. संजू सॅमसन ७ धावांवर माघारी परतला. त्यामुळे ऋतुराज गायकवाड आणि आयुष म्हात्रेवर जबाबदारी होती. दोघांनी मिळून अर्धशतकी भागीदारी केली. ऋतुराजने १९ धावा केल्या. तर आयुष म्हात्रेने ३० धावांचे योगदान दिले. त्यानंतर मॅथ्यू शॉर्टने एकेरी दुहेरी धाव घेऊन डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला. पण तो देखील ३० धावा करून माघारी परतला. सर्फराज खानने २५ धावांचे योगदान दिले. डेवाल्ड ब्रेव्हिस शून्यावर माघारी परतला. शिवम दुबे २१ धावा करून माघारी परतला. त्यानंतर शेवटी अंशूल कंबोज आणि ओव्हरटनने विजय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. पण हैदराबादने हा सामना १० धावांनी आपल्या नावावर केला. या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या हैदराबादकडून अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड या जोडीने दमदार सुरुवात करून दिली. दोघांनी मिळून पावरप्लेमध्ये ७५ धावा जोडल्या.

हैदराबाद: तिसऱ्या विजयाची नोंद केली

या सामन्यातील शेवटचे षटक प्रफुल हिंगेने टाकले. सुरूवातीच्या ३ षटकांमध्ये तो खूप महागडा ठरला होता. पण तरीही इशान किशनने त्याच्यावर विश्वास दाखवला आणि प्रफुलने हा विश्वास सार्थ ठरवला आणि विजय मिळवून दिला. हैदराबादकडून इशान मलिंगाने ३, नितीश कुमारने २, प्रफुल हिंगे, साकिब हुसेन आणि शिवांग कुमारने प्रत्येकी १-१ गडी बाद केला.

आंबेडकर जयंतीनिमित्त दलित पँथर महिला आघाडीचा अन्नदान उपक्रम

उंड्री येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन; नागरिकांना अन्नदान वाटप

जन सम्राट टाईम्स

पुणे : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पुण्यात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्याच पार्श्वभूमीवर दलित पँथर महिला आघाडीच्या वतीने अन्नदान व अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. उंड्री येथील वडाचीवाडी रोड, श्री राज अपार्टमेंट परिसरात हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. दलित पँथर पुणे शहर जिल्हा महिला अध्यक्ष सोनाली दूनघव यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी "जय भीम"च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडत महान व्यक्तिमत्त्वाला आदरांजली अर्पण केली. यानंतर गरजू नागरिकांसाठी अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात आला. या

उपक्रमात परिसरातील अनेक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. समाजातील वंचित आणि गरजू घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला. कार्यक्रमात करुणा खलुले, संगीता कदम, रंजना कोनापुरे, अर्चना चेंडके, सुरेखा माने, शुभांगी दिवटे, रश्मी गूऊन, धर्मात्मा कदम, कुंदन ठाकूर, गणपती चेंडके यांच्यासह अनेक महिला कार्यकर्त्या व नागरिक उपस्थित होते. यावेळी वक्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण करत समाजात समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जपणूक करण्याचे आवाहन केले. त्यांच्या कार्याचा आदर्श घेत समाजासाठी कार्य करणे हीच खरी त्यांना आदरांजली असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. हा उपक्रम केवळ अभिवादनापुरता मर्यादित न राहता समाजसेवेच्या माध्यमातून साजरा करण्यात आल्याने परिसरातील नागरिकांनी त्याचे स्वागत केले. सामाजिक बांधिलकी जपत अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

पुण्यात राज्यस्तरीय ख्रिस्ती वधू-वर परिचय मेळाव्याला प्रतिसाद

सुमारे ५० वधू-वरांचा सहभाग

जन सम्राट टाईम्स

पुणे (शंकर जोग): पुण्यात आयोजित राज्यस्तरीय ख्रिस्ती वधू-वर पालक परिचय मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. गुरुवार पेठेतील पंचहौद येथील पवित्र नाम देवालयात पार पडलेल्या या मेळाव्यात सुमारे ५० वधू-वरांनी सहभाग घेत आपापले बायोडाटा सादर केले. विविध क्षेत्रांत कार्यरत, उच्चशिक्षित तसेच नोकरी आणि व्यवसाय करणाऱ्या युवक-युवतींच्या सहभागामुळे मेळाव्याला विशेष आकर्षण लाभले. पवित्र नाम देवालय पंचहौद पुणे आणि 'साप्ताहिक उपदेशक' यांच्या संयुक्त विद्यमाने या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राज्याच्या विविध भागांतून वधू-वर तसेच त्यांच्या पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मेळाव्याला प्रतिसाद दिला. या माध्यमातून अनेक कुटुंबांना एकमेकांशी संवाद साधण्याची आणि योग्य जुळणीच्या संधी शोधण्याची संधी उपलब्ध झाली. मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे सहभागी वधू-वरांची शैक्षणिक आणि व्यावसायिक गुणवत्ता. अनेक उमेदवार उच्चशिक्षित असून विविध क्षेत्रांत स्थिरावलेले आहेत. यामुळे पालकांमध्येही समाधानाचे वातावरण दिसून आले. प्रत्यक्ष भेटीगाठी, संवाद आणि माहितीची देवाणघेवाण यामुळे विवाह जुळवणीसाठी उपयुक्त व्यासपीठ तयार झाले.

या मान्यवरांनी सहभाग नोंदवला

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रेव्ह. अशोक कॅरम, रेव्ह. जयंत गायकवाड, रेव्ह. जयप्रकाश आढाव, रेव्ह. प्रदीप वाघमारे, पास्टर अनिल गडकरी यांची उपस्थिती लाभली. तसेच सुनील शिरसाठ, सरोज पिल्ले, सुरेखा पुणेकर, भालचंद्र कांबळे, आशा गायकवाड, चंद्रकांत काळे, अर्पणा जाधव आदी मान्यवरांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणी अत्यंत सुयोग्य पद्धतीने करण्यात आली होती. सचिव मनोज येवलेकर, विजया इंदुरकर, विकास उमापती, आशा पाटोळे, राजेंद्र पवार, प्राजक्ता परोळ, प्रशांत सूर्यवंशी, रोजमेरी साठे, कौमुदी येवलेकर आणि शिरीष पाठक यांनी या उपक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

गिलचा झंझावात; गुजरातची कोलकातावर ५ गडी राखून थरारक मात

शुभमन गिलच्या ८६ धावांच्या खेळीने रंगला पाठलाग; रबाडा-सिराजची प्रभावी गोलंदाजी

जन सम्राट टाईम्स

मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : आयपीएल २०२६ मधील २५व्या सामन्यात GUJARAT TITANS ने KOLKATA KNIGHT RIDERS वर ५ गडी राखून रोमांचक विजय मिळवत स्पर्धेत दमदार छाप पाडली. अहमदाबाद येथील NARENDRA MODI STADIUM वर झालेल्या या सामन्यात कोलकाताने २० षटकांत १८० धावा केल्या, तर गुजरातने १९.४ षटकांत १८१/५ धावा करत लक्ष्य गाठले. कोलकाताची सुरुवात मात्र अत्यंत खराब झाली. कर्णधार AJINKYA RAHANE पहिल्याच चेंडूवर बाद झाला. त्यानंतर अंगकृष रघुवंशी आणि टिम सिफर्टही लवकर माघारी परतल्याने डाव अडचणीत सापडला.

या संकटात CAMERON GREEN ने ५५ चेंडूत ७९ धावांची जबरदस्त खेळी करत संघाला सावरले. ROVMAN POWELL ने २७ धावांची साथ दिली, तर शेवटी रामनदीप सिंगने जलद १७ धावा जोडल्या. मात्र नियमित अंतराने पडलेल्या विकेट्समुळे कोलकाताला मोठी धावसंख्या उभारता आली नाही. गुजरातकडून KAGISO

RABADA ने ३/२९ अशी प्रभावी कामगिरी करत कोलकाताचा कणा मोडला. MOHAMMED SIRAJ ने २ बळी घेत साथ दिली, तर RASHID KHAN ने मधल्या षटकांत धावांवर नियंत्रण ठेवले. १८१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातची सुरुवात आत्मविश्वासपूर्ण झाली. साई सुदर्शनने २२ धावा करत पाया रचला. त्यानंतर कर्णधार SHUBMAN GILL ने आक्रमक फलंदाजी करत ५० चेंडूत ८६ धावांची शानदार खेळी साकारली. त्याने चौकार-षटकारांच्या सहाय्याने सामना गुजरातच्या बाजूने झुकवला. JOS BUTTLER ने २५ धावांची जलद साथ दिली, तर वॉशिंग्टन सुंदरने संयमी खेळ करत भागीदारी मजबूत केली. १४व्या ते १७व्या षटकांदरम्यान गिलने केलेल्या आक्रमक फटक्यांनी सामना निर्णायक वळणावर गेला. शेवटी ग्लेन फिलिप्स आणि RAHUL TEWATIA यांनी संयम राखत संघाला विजय मिळवून दिला. कोलकाताकडून VARUN CHAKRAVARTHY ने २ बळी घेत काहीसा प्रतिकार केला, तर SUNIL NARINE ने सुरुवातीला अडथळा निर्माण केला. मात्र गिलच्या तडाख्यापुढे त्यांची गोलंदाजी अपुरी ठरली. शनिवारच्या दुहेरी सामन्यांकडे लक्ष या विजयामुळे स्पर्धा अधिक रंगतदार बनली असून आता शनिवारच्या सामन्यांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ROYAL CHALLENGERS BANGALORE विरुद्ध DELHI CAPITALS हा सामना दुपारी रंगणार आहे. बंगळुरूकडून VIRAT KOHLI चांगल्या फॉर्ममध्ये आहे, तर दिल्लीला सातत्याचा शोध आहे.

सायंकाळच्या सामन्यात SUNRISERS HYDERABAD आणि CHENNAI SUPER KINGS आमनेसामने येणार आहेत. हैदराबादकडून इशान किशन आणि हेन्रिख क्लासेन यांची आक्रमक फलंदाजी संघाला बळ देत आहे, तर चेन्नईचा अनुभवी संघ पुनरागमनासाठी सज्ज आहे.

"इंडिया अर्थात भारत" : देशाची खरी ओळख : भद्रे

जन सम्राट टाईम्स

पुणे : च-होली येथे तथागत वेल्फेअर फाउंडेशन आणि सप्तगड भीम महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित भव्य कार्यक्रमात "इंडिया अर्थात भारत हीच आपल्या देशाची खरी ओळख आहे," असा ठाम संदेश स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक व राज्यघटना अभ्यासक संघशिल भद्रे (एस. एन. नांदेडकर) यांनी दिला. त्यांच्या प्रभावी मार्गदर्शनामुळे कार्यक्रमाला उपस्थित नागरिक, युवक-युवती आणि विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल नवचेतना निर्माण झाल्याचे चित्र

पाहायला मिळाले. संघशिल भद्रे यांनी आपल्या भाषणात भारतीय राज्यघटनेच्या कलम १चा उल्लेख करत "INDIA, THAT IS BHARAT, SHALL BE A UNION OF STATES" या वाक्याचा अर्थ स्पष्ट केला. 'इंडिया' ही आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख असली, तरी 'भारत' हा आपल्या संस्कृतीचा, इतिहासाचा आणि स्वाभिमानाचा आत्मा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. त्यामुळे प्रत्येक भारतीयाने ही दुहेरी ओळख अभिमानाने स्वीकारून जगासमोर मांडली पाहिजे, असे ते म्हणाले. ते पुढे म्हणाले की, भारतीय राज्यघटना ही केवळ कायद्यांचा संच नसून ती समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांची जीवनशैली आहे. "हा देश केवळ एका धर्माचा नसून सर्व धर्मांचा आहे," असे सांगताना त्यांनी सर्वधर्मसमभावाचे महत्त्व अधोरेखित केले.

प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य देत समाजात एकोपा आणि राष्ट्रीय एकात्मता मजबूत करण्याचे काम राज्यघटना करते, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात विविध मान्यवरांची उपस्थिती लक्षवेधी ठरली. तथागत वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष रंगनाथ वाघमारे, खजिनदार सदानंद उदागे, सचिव राजू इंगळे, सल्लागार प्रविण सोनवणे, उपाध्यक्ष राजेंद्र ढगे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीचे अध्यक्ष धनराज मनोहर, खजिनदार समाधान ओव्हाळ, सचिव सचिन कांबळे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. याशिवाय, आंबेडकरी सांस्कृतिक चळवळीचे राज्य प्रतिनिधी व पुणे जिल्हा समन्वयक, सुप्रसिद्ध व्याख्याते अँड. नितीन घोडके, प्रशांत देठे आणि इतर मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाला विशेष आकर्षण ठरली.

भाजपमध्ये स्वीकृत नगरसेवक पदांवरून खळबळ

काळभोर-लांडगे वाद चव्हाट्यावर

जन सम्राट टाईम्स

पिंपरी-चिंचवड: पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील स्वीकृत नगरसेवक पदांच्या नियुक्तीवरून भारतीय जनता पार्टीत अंतर्गत संघर्ष उफाळून आला असून, सचिन सुदाम काळभोर यांच्या नावाभोवती राजकीय वातावरण तापले आहे. येत्या सोमवारी स्थायी समितीच्या बैठकीत ७ स्वीकृत नगरसेवकांची नावे जाहीर होणार असल्याने या निर्णयाकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. महापौर रवी लांडगे आणि उपमहापौर शर्मिला बाबर यांनी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांना लेखी पत्र देत सचिन काळभोर यांची स्वीकृत नगरसेवक पदासाठी शिफारस केली आहे. त्यामुळे काळभोर यांच्या नावाला मोठे बळ मिळाल्याचे मानले जात आहे. मात्र, दुसऱ्या बाजूला आमदार महेश लांडगे यांनी या नियुक्तीला ठाम विरोध दर्शवला असून त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांना पत्र पाठवून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. एकाच पक्षात दोन गट आमनेसामने या घडामोडींमुळे भाजपमध्ये दोन गट स्पष्टपणे समोर आले आहेत. एका बाजूला महापौर आणि उपमहापौर यांचा पाठिंबा असलेले काळभोर समर्थक, तर दुसऱ्या बाजूला आमदार लांडगे यांचा विरोध — अशा परिस्थितीत पक्षातील अंतर्गत संघर्ष उघडपणे समोर आला आहे. या वादामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक पातळीवर राजकीय समीकरणे ढवळून निघाली आहेत. जुन्या कार्यकर्त्यांना संधी की नव्या चेहऱ्यांना? या नियुक्त्यांच्या पार्श्वभूमीवर आणखी एक महत्त्वाचा मुद्दा चर्चेत आहे. स्वीकृत नगरसेवक पदांसाठी पक्षातील जुने, निष्ठावंत कार्यकर्त्यांना प्राधान्य दिले जाणार की इतर पक्षांतून नुकतेच भाजपमध्ये दाखल झालेल्या नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाणार, यावरही चर्चा रंगली आहे. त्यामुळे ही निवड केवळ सात जागांची नसून, पक्षातील भविष्यातील नेतृत्वाच्या दिशेचा संकेत मानली जात आहे. सोमवारी होणार निर्णायक घोषणा भाजप गटनेते प्रशांत शितोळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी स्थायी समितीच्या बैठकीत सात स्वीकृत नगरसेवकांची अधिकृत घोषणा होणार आहे. या यादीत कोणाचा समावेश होतो, यावरून पक्षातील अंतर्गत शक्तिसंतुलन स्पष्ट होणार आहे. निर्णयावर अवलंबून पुढील राजकारण सचिन काळभोर आणि आमदार महेश लांडगे यांच्यातील वाद हा नवीन नसून गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असल्याची चर्चा आहे. मात्र, या नियुक्तीच्या निमित्ताने हा संघर्ष पुन्हा तीव्र झाला आहे. त्यामुळे पक्षश्रेष्ठी कोणाच्या बाजूने उभे राहतात, यावर पुढील राजकीय घडामोडी ठरणार आहेत. एकंदर, स्वीकृत नगरसेवक पदांच्या नियुक्तीवरून भाजपमध्ये सुरू असलेले अंतर्गत राजकारण आता चव्हाट्यावर आले असून, सोमवारी होणारा निर्णय हा केवळ नियुक्तीपुरता मर्यादित न राहता पक्षातील गटबाजी आणि भविष्यातील राजकीय समीकरणे ठरवणारा ठरणार आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

अभिषेक शर्माने वीरेंद्र सेहवागचा रेकॉर्ड मोडला!

IPL इतिहासात अशी कामगिरी करणारा ठरला सर्वात वेगवान खेळाडू

जन सम्राट टाईम्स

मुंबई : आयपीएल २०२६च्या रायव्हलरी विकमधील अखेरचा सामना चेन्नई सुपर किंग्स आणि सनरायझर्स हैदराबाद या संघांमध्ये खेळवली जात आहे. या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अभिषेक आणि ट्रॅव्हिस हेड यांनी पहिल्या विकेटसाठी ७५ धावांची भागीदारी करून संघाला वेगवान सुरुवात करून दिली. सीएसकेविरूद्ध अभिषेक शर्माची बॅट चांगलीच तळपली. त्याने अवघ्या १५ चेंडूत अर्धशतक झळकावलं. या खेळीदरम्यान त्याने वीरेंद्र सेहवागचा विक्रम मोडत मोठी कामगिरी केली. अभिषेक शर्माने या सामन्यात उत्कृष्ट ५९ धावांची खेळी साकारली. अभिषेकच्या ५९ धावांच्या शानदार खेळीने, माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवागचा विक्रम मोडून एक मोठा आयपीएल विक्रम आपल्या नावे केला आहे. यासह सेहवागचा विक्रम मोडत अशी कामगिरी करणारा तो भारताचा पहिला खेळाडू ठरला आहे. गेल्या काही हंगामांमध्ये

आयपीएलमध्ये अनेक मोठे विक्रम मोडले गेले आहेत, ज्याचे मुख्य कारण फलंदाजीच्या शैलीतील लक्षणीय बदल आहे. अभिषेक शर्मा आता आयपीएलच्या इतिहासात सर्वात कमी चेंडूंमध्ये २ हजार धावा पूर्ण करणारा खेळाडू ठरला आहे. अभिषेकने अवघ्या ११९३ चेंडूंमध्ये हा पराक्रम केला आणि ११२० चेंडूंमध्ये २ हजार आयपीएल धावा पूर्ण करणाऱ्या आंद्रे रसेलला मागे टाकलं. अभिषेक शर्माने वीरेंद्र सेहवागचा विक्रम मोडला, जो यापूर्वी हा टप्पा सर्वात जलद गाठणारा भारतीय खेळाडू होता. वीरेंद्र सेहवागने १२११ चेंडूंमध्ये २ हजार आयपीएल धावा पूर्ण केल्या होत्या.इंडियन प्रीमियर लीगच्या इतिहासात २० चेंडूंच्या आत सर्वाधिक अर्धशतकं करण्याचा विक्रम अभिषेक शर्माच्या नावावर आहे, त्याने ही कामगिरी सहा वेळा केली आहे. या यादीत दुसऱ्या क्रमांकावर वैभव सूर्यवंशी, जॅक फ्रेझर मॅकगर्क, ट्रॅव्हिस हेड आणि निकोलस पूरन आहेत, ज्यांनी प्रत्येकी तीन वेळा हा पराक्रम केला आहे.

अभिषेक शर्माने अर्धशतक झळकावलं

मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्स या दोन्ही संघांविरुद्ध २० पेक्षा कमी चेंडूंमध्ये अर्धशतक झळकावलं आहे. अभिषेक शर्माने या सामन्यात उत्कृष्ट ५९ धावांची खेळी साकारली. अभिषेकच्या ५९ धावांच्या शानदार खेळीने, माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवागचा विक्रम मोडून एक मोठा आयपीएल विक्रम आपल्या नावे केला आहे.